वाचा :-१.कार्यकारी अभियंता (स्था), म.रा.वि.वि.कं.मर्या.स्थापत्य विभाग नांदेड यांचे पत्र क्रं.स्थापत्य विभाग/नांदेड/मांस क्रं.६१५ दि.१.०७.२०१६.

२.उपविभागीय अधिकारी गंगाखेड तथा भुसंपादन अधिकारी गंगाखेड यांचा अहवाल क्रं.२०१६/भुसं/जमा-१/सी-३/कावी दिनांक १९.१०.२०१६

४.उपअधिक्षक भुमी अभिलेख,गंगाखेड यांची प्रस्तावीत जमीन मोजणी दिनांक २९.०९.२०१६ ची नकाशा प्रत.

५.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद परभणी यांचे पत्र क्रंमाक जिप/साप्रवि/व्हिपी-३/कावी/५९६/१६ दिनांक २४ ऑक्टोंबर,२०१६

६.सहायक संचालक,नगररचना,परभणी यांचा अहवाल मौ.सारंगी/ता.पुर्णा/जागा मागणी/३३ के.व्हि./ससंनर/८१३ दि.२५.१०.२०१६.

७.महाराष्ट्र शासन, उदयोग,उर्जा व कामगार विभाग निर्णय क्रंमाकःसंकिर्ण २०१६/प्र.क्रं.५०/उर्जा५ दिनांक ११ एप्रिल,२०१६

८.महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,निर्णय क्रंमाक जमीन०५/२०१२/प्र.क्रं.९०/ज-१ दिनांक २७ जुलै २०१२.

९.महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-ब अधिसूचना क्रं.जमीन-२०१५/ प्र.क्रं.५५/ज-१, दिनांक ३१.१२.२०१५.

१०.महाराष्ट्र जमीन महसुल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१

जा.क्र.२०१६/आरबीडेस्क/एलएनडी-१/सिआर१५ 2917
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
दिनांक :-१६/१२/२०१६

## आदेश

ज्याअर्थी कार्यकारी अभियंता, (स्था.),म.रा.वि.वि.कं.मर्या.स्थापत्य विभाग, नांदेड व अधिक्षक अभियंता, महावितरण, सं.व.सु.मंडल परभणी यांनी परभणी जिल्हयातील मौ.सांरगी ता.पुर्णा येथे महावितरण तर्फे तातडीने ३३/११ के.व्हि.उपकेंद्र उभारण्याचे तातडीने प्रस्तावीत असल्यामुळे मौ.सारंगी ता.पुर्णा येथील गंट नं.४५ मधुन ६० आर जमीन प्रदान करण्याबाबत या कार्यालयास प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच सदर प्रस्तावानुसार उपविभागीय अधिकारी गंगाखेड यांनी मौ.सांरगी ता.पुर्णा येथील उपकेंद्रासाठी उक्त नमुद जमीन प्रदान करण्याबाबत तहसिलदार गंगाखेड यांनी विहित प्रपत्र व कागदपत्रासह दिलेला प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रमाणे विहित प्रपत्रात सादर केलेल्या अहवालानुसार प्रदान करावयाची मौ.सारंगी ता.पुर्णा येथील गट नं.४५ मधुन ६० आर या प्रस्तावीत जमीनीत सध्या कोणताही वापर चालु नाही व न्यायालयात या जमीनीबाबत कोणतेही प्रकरण कोणत्याही स्तरावर प्रलंबीत नाही व सदर जमीन उपकेंद्रासाठी प्रदान करण्याबाबत निर्विवाद आहे. तसेच सदर जमीन अतिक्रमण विरहीत व मोकळी आहे. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रंमाक संकिर्ण-२०१६/प्र.क्रं.५०/उर्जा-५ दिनांक ११ एप्रील २०१६ निर्णयाप्रमाणे महावितरण यांनी दिलेल्या अहवालानुसार केंद्र शासन पुरस्कृत दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजने अंतर्गत मौ.सांरगी येथे प्रस्तावीत ३३/११ उपकेंद्र प्रस्तावीत केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम २२ नुसार प्रदान केलेल्या शक्ती नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील तरतुदीस अधिन राहून मी जिल्हाधिकारी, सदर उपकेंद्राककरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख पुर्णा यांच्या मोजणी नकाशात दर्शविलेली मौ.सांरगी ता.पुर्णा येथील गट नं.४५ मधुन ६० आर ही सरकारी गायरान जमीन महावितरण कपंनीस रुपये १/- प्रतिवर्ष या नाममात्र भुई भाडयाने ३० वर्षासाठी, त्याच तत्वावर पुढील नूतनीकरणाच्या तरतुदीसह खालील अटी व शर्तीस अधिन राहुन प्रदान करीत आहे.

LOS-727
22/12/2016

19-12-16

BD:2005
20/12/16

## अटी व शर्ती

१. जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय निहित केलेली जमीन वा तीचा कोणताही भाग किंवा त्यावर बांधलेली इमारत गहाण, बक्षीस, दान,बी.ओ.टी. किंवा अन्य मार्गाने वर्ग करता येणार नाही किंवा हस्तांतरण करता येणार नाही.

२. ज्या प्रयोजनासाठी जमीन प्रदान केली आहे. त्या प्रयोजनाव्यतीरिक्त इतर प्रयोजनासाठी सदर जमीनीचा वापर करता येणार नाही.

३. सदर जमीनीच्या विकासासंबंधी रेखांकन, बांधकाम परवाणगी, सदर जागा बांधकाम योग्य आहे काय, इत्यादी बाबत विकास नियंत्रन नियमावलीनुसार संबंधीत सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात यावी.

४. उक्त जमीनीच्या परिसरात प्रचलित असणारा व वेळोवळी ठरविण्यात येणा-या तिच्या अकृषिक आकार प्रतिगृहिता नियमितपणे शासन जमा करील.

५. संस्थेकडे निहीत केलेली जमीन महसूल खात्याकडे परत घेण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

६. जमीनीचे संरक्षण करणे, देखभाल करणे, तसेच निहित केलेल्या जमीनीवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व वेळोवेळी विहीत केलेल्या अटी व शर्ती बंधन कारक राहतील.

८. सदर जमीन भोगवटदार वर्ग - २ म्हणून व अविभाज्य शर्तीने धारण करेल.

९. शर्तीचा अशंतः अथवा पूर्णतः शर्तभंग झाल्याचे निदर्शनास आल्यास मंजूर केलेली जमीन इमारतीसह कोणताही मोबदला न देता शासन पून्हा ताब्यात घेईल.

१०.आवश्यक तेथे झाडे लावणे व त्यांचे संगोपन करणे बंधनकारक राहील.

११.जमीनीच्या खनिज संपत्तीवर शासनाचा अधिकार राहील.

१२.सदर भाडेपटटा नुतनीकरण करणे आवश्यक असल्यास भाडेपटटयाची मुदत संपण्यापुर्वी सहा महिने आगोदर भाडेपटटा नुतनीकरण प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा अन्यथा सदरील जागेची आवश्यकता नसल्यास जमीन महसुल खात्यास परत करावी.

१३.सदर जमीनीचा ताबा घेण्यापुर्वी महाराष्ट्र शासन,महसुल व वन विभाग परिपत्रक क्रंमाकःसंकिर्ण-०५/२००६/प्र.क्रं.४३/ज-१ दिनांक ३१ ऑक्टोंबर,२००६ व महाराष्ट्र शासन,महसुल व वन विभाग शुध्दीपत्रक दिनांक ०५ डिसेंबर, २०१३ मधील तरतुदीनुसार तहसिलदार पुर्णा यांचेकडे विहित नमुन्यातील नोंदणीकृत करारनामा करुन देणे व आदेशातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अभिप्रमाणीत हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

१४.महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रंमाकः संकिर्ण-२०१६/प्र.क्रं.५०/उर्जा-५ दिनांक ११ एप्रील २०१६ निर्णयाप्रमाणे सदरील जमीनीच्या मुल्यांकन किंमतीच्या वाढीव विदयुत पायाभुत सुविधा जिल्हयामध्ये उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही महावितरण कंपनीने करावी. तसेच वाढीव पायाभुत सुविधाची माहिती अधिक्षक अभियंता, महावितरण परभणी यांनी विहित प्रपत्रात मासिक अहवालाच्या स्वरुपात या कार्यालयास सादर करावी.

१५.सहायक संचालक,नगररचना परभणी यांच्या अटीस अधिन राहुन सदर वीज उपकेंद्राच्या जागेस कमीत कमी १२.० मी. रुंद पोहचरस्ता असावा.

स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी परभणी**

प्रतिलिपीः

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. अधिक्षक अभियंता,महावितरण परभणी यांना कार्यवाहीस्तव.

३. कार्यकारी अभियंता (स्था), म.रा.वि.वि.कं.मर्या.स्थापत्य विभाग नांदेड यांना कार्यवाहीस्तव.

४. उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

५. तहसिलदार, पुर्णा यांना खालील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

**अ.** कार्यकारी अभियंता (स्था), म.रा.वि.वि.कं.मर्या.स्थापत्य विभाग नांदेड किंवा त्यांच्या मार्फत नियुक्त प्रतिनिधी याच्यासह मौ.सारंगी ता.पुर्णा जि.परभणी येथे प्रस्तावीत ३३/११ के.व्हि. उपकेंद्र उभारणीकरीता मौ.सारंगी ता.पुर्णा येथील गट नं.४५ मधुन ६० आर जमीन भाडेपटटयाने प्रदान करण्याबाबत नोंदणीकृत करारनामा करावा तसेच आदेशात नमुद अटी व शर्ती मान्य असल्याबाबत लेखी अभिप्रमाणीत हमीपत्र घेउन सदर जमीनीचा ताबा देण्याची कार्यवाही करावी. तदनंतर महसुली अभिलेख्यात नोंद घेउन ताबा पावतीसह अहवाल सादर करावा.

**आ.** प्रतिवर्ष रु.१/- याप्रमाणे भाडेपटटा रकमेचे चलन शासन जमा करुन घ्यावे.

**इ.** महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग परिपत्रक क्रं.लेखाप-१०-२०११-प्र.क्रं.१५९ ज-१ दिनांक ३१.०३.२०१२ नुसार शासकिय जमीन कब्जेहक्कान व भाडेपटटयाने प्रदान केलेल्या नोंदवहीत सदर भाडेपटटा प्रकरणाची नोंद करावी.

**ई.** महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, परिपत्रक क्रं.जमीन -०८/२०१२/प्र.क्रं.५१/ज-१ दिनांक २३ ऑक्टोंबर,२०१२ नुसार तहसिलदार पुर्णा यांनी महाराष्ट्र जमीन महसुल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे), नियम १९७१ चे नियम ४९ नुसार नमुना १८ मधील प्रमाणपत्र देउन सदर प्रमाणपत्र संबधीत जागेतील इमारत सिमा/भिंत येथील दर्शनी भागावर पेंट करावे.

(स्थळ प्रतिवर स.जिल्हाधिकारी परभणी यांची स्वाक्षरी असे)

**जिल्हाधिकारी परभणी करीता**